# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला



# दहशतवाद जगाला लागलेली कीड

**डॉ. डी. बी. शेकटकर : राजगुरू महाविद्यालयात व्याख्यानमाला**

राजगुरूनगर, दि. १ (प्रतिनिधी) - दहशतवादी जन्माला येत नाहीत तर त्यांना वारंवार तयार करून त्यांची दहशतवादी मानसिकता घडवली जाते. दहशतवाद ही जगाला लागलेली कीड आहे. यामुळे अखंड मानवजातीचे नुकसान होणार आहे. यासाठी तरुण पिढीने सगळ्या प्रकारच्या आमिषांपासून दूर राहायला हवे. कोणतीही टोकाची विचारसरणी न स्वीकारता सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची भूमिका तरुणांची असायला हवी, असे प्रतिपादन निवृत्त लष्करी अधिकारी लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर यांनी केले.



राजगुरूनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेतील शेवटच्या पुष्पाप्रसंगी झालेली गर्दी. (इनसेटमध्ये मार्गदर्शन करताना डॉ. डी. बी. शेकटकर.)

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे शेवटचे पुष्प गुंफताना 'दहशतवादाविरोधात लढा आणि युवकांचे स्थान' या विषयावर बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक एअर कमांडर गणेश जोशी, बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. डी. बी. शेकटकर म्हणाले की, जगात ३१ दहशतवादी संघटना असून पाकिस्तान हे या दहशतवादी मानसिकतेचे उगमस्थान आहे. त्यांनीच दहशतवादी पोसले आणि जगभर तयार करण्याचे तंत्र दहशतवाद्यांनी शोधले. सध्याच्या काळात दहशतवाद हा युद्धाला पर्याय झाला असून यापुढील युद्धे समोरासमोर होण्याऐवजी दहशतवादाच्या माध्यमातून लढली जाणार आहेत. एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निरपराध लोकांना वेठबंद धरून दशहत माजवण्याची रीत रूढ होणे हे समाजापुढील मोठे संकट आहे. त्यासाठी युवकांनी कायम तत्पर राहून अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने आपला सहभाग देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केला तर व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले.

**पाकिस्तान दहशतवादी मानसिकतेचे उगमस्थान**

**दहशतवाद युद्धाला झाला पर्याय**

### आईची मांडी म्हणजे विश्वविद्यालय

२१ वे शतक हे ज्ञान तंत्रज्ञानाचे शतक असून विद्यार्थ्यांनी नेहमी नावीन्याचा ध्यास घेताना आपली सर्जनशीलता जपायला हवी. ज्ञानाने मानाने मोठे होतानाच आपल्या आई वडिलांची काळजी घ्या. आईची मांडी ही जगातील सर्वात मोठे विश्वविद्यालय आहे, त्याचा सन्मान राखा. मुलामुलींनी उच्चशिक्षित होऊन समाजाचे नेतृत्व करा. सैन्यात भरती व्हा. देशाची सेवा करा आणि स्वयंसेवक होऊन समाजाची सेवा करा, असे आवाहन डॉ. डी. बी. शेकटकर यांनी केले.

# दहशतवादी जन्माला येत नाही, घडवला जातो : शेकटकर






राजगुरुनगर । वार्ताहर

दहशतवादी लोक जन्माला येत नाहीत तर त्यांना वारंवार तयार करून त्यांची दहशतवादी मानसिकता घडवली जाते. त्यातून त्यांच्यातील विध्वंसकवृत्ती वाढीला लागून त्यांच्यातले माणूसपण संपून जाते आणि दहशतवादी तयार होतो असे प्रतिपादन निवृत्त लष्करी अधिकारी लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे सहावे पुष्प गुंफताना 'दहशतवादाविरोधात लढा आणि युवकांचे स्थान' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष बाळासाहेब टाकळकर, संचालक [illegible] गणेश [illegible] जोशी, बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी बोलताना डॉ. डी. बी. शेकटकर म्हणाले की, दहशतवाद ही जगाला लागलेली कीड आहे. यामुळे अखंड मानवजातीचे नुकसान होत आहे. यासाठी तरुण पिढीने सगळ्या प्रकारच्या अमिषांपासून दूर राहायला हवे. कोणतीही टोकाची विचारसरणी न स्वीकारता सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची भूमिका तरुणांची असायला हवी. दहशतवादाबद्दल माहिती सांगताना ते म्हणाले की, जगात ३१ दहशतवादी संघटना असून पाकिस्तान हे या दहशतवादी मानसिकतेचे उगमस्थान आहे. त्यांनीच दहशतवादी पोसले आणि आजवर तयार करण्याचे तंत्र दहशतवाद्यांपर्यंत पोचवले. सध्याच्या काळात दहशतवाद हा युवकांपर्यंत [illegible] असून यापुढील युद्धे समोरासमोर होण्याऐवजी दहशतवादाच्या माध्यमातून लढली जाणार आहेत. एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निरपराध लोकांना वेठीस धरून त्या मागण्याची रीत रूढ होणे हे समाजापुढील मोठे संकट आहे. त्यासाठी युवकांनी कायम सजग राहून अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने आपला सहभाग देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, २१ वे शतक हे ज्ञान तंत्रज्ञानाचे शतक असून विद्यार्थ्यांनी नेहमी नाविन्याचा ध्यास घेताना आपली सर्जनशीलता जपायला हवी. ज्ञानाने माणूस मोठे होण्याआधी आपल्या आई वडिलांची काळजी घ्या. आईची मांडी हे जगातील सर्वात मोठे विश्वविद्यालय आहे, त्याचा सन्मान राखा. मुलामुलींनी उच्चशिक्षित होऊन समाजाचे नेतृत्व करा. सैन्यात भरती व्हा. देशाची सेवा करा, आणि स्वयंसेवक होऊन समाजाची सेवा करा, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केला तर आभार व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल कुलकर्णी यांनी मानले.

सकाळ
पुणे, शनिवार
४ फेब्रुवारी २०१७
५

# यापुढील युद्धे दहशतवादाच्या माध्यमातून

## निवृत्त लेफ्टनंट जनरल शेकटकर यांचे प्रतिपादन; राजगुरुनगरला व्याख्यानमाला

राजगुरुनगर, ता. ३ : सध्याच्या काळात दहशतवाद हा युद्धाला पर्याय झाला असल्याने यापुढील युद्धे समोरासमोर होण्याऐवजी दहशतवादाच्या माध्यमातून लढली जाणार आहेत. एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निरपराध लोकांना बेसावध गाठून ठार मारण्याची रीत रूढ होणे हे समाजापुढील मोठे संकट आहे, असे प्रतिपादन निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ. दत्तात्रेय शेकटकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'दहशतवादविरोधात लढा आणि युवकांचे स्थान' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक गणेश त्र्यंबक जोशी, बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी आदी उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर.

शेकटकर म्हणाले, "दहशतवाद ही जगाला लागलेली कीड आहे. दहशतवादी लोक जन्माला येत नाहीत, तर त्यांच्या मनात सातत्याने विष पेरून त्यांची मानसिकता घडवली जाते. त्यातून त्यांच्यामधील विध्वंसकवृत्ती वाढीस लागून त्यांच्यातले माणूसपण संपून जाते. पाकिस्तान हे या दहशतवादी मानसिकतेचे उगमस्थान आहे. त्यांनीच दहशतवादी पोसले. तरुण पिढीने सगळ्या प्रकारच्या आमिषांपासून दूर राहायला हवे. कोणतीही टोकाची विचारसरणी न स्वीकारता सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची भूमिका तरुणांची असली पाहिजे."

विद्यार्थ्यांनी नेहमी सर्वांच्याच ध्यास घेतला आपली सर्जनशीलता जपायला हवी. मुला-मुलींनी उच्चशिक्षित होऊन समाजाचे नेतृत्व करावे आणि स्वयंसेवक होऊन समाजाची व देशाची सेवा करावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी, तर आभार प्रा. अनिल कुलकर्णी यांनी मानले.

लोकमत पुणे, गुरुवार, दि. २ फेब्रुवारी २०१७ ५

# दहशतवादी घडवला जातो : शेकटकर

राजगुरुनगर : दहशतवादी जन्माला येत नाहीत तर त्यांना वारंवार तयार करून त्यांची दहशतवादी मानसिकता घडवली जाते. त्यातून त्यांच्यामधील विध्वंसक वृत्ती वाढीला लागून त्यांच्यातले माणूसपण संपून जाते आणि दहशतवादी तयार होतो, असे प्रतिपादन निवृत्त लष्करी अधिकारी लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे शेवटचे पुष्प गुंफताना 'दहशतवादविरोधात लढा आणि युवकांचे स्थान' या विषयावर ते बोलत होते.



साहेबराव बुट्टेपाटील व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना डॉ. डी. बी. शेकटकर.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक एअर कमोडोर गणेश त्र्यंबक जोशी, बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. शेकटकर म्हणाले, दहशतवाद ही जगाला लागलेली कीड आहे. यामुळे अखंड मानवजातीचे नुकसान होणार आहे. यासाठी तरुण पिढीने सगळ्या प्रकारच्या आमिषांपासून दूर राहायला हवे. कोणतीही टोकाची विचारसरणी न स्वीकारता सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची भूमिका तरुणांची असायला हवी. जगात ३१ दहशतवादी संघटना असून पाकिस्तान हे या दहशतवादी मानसिकतेचे उगमस्थान आहे. त्यांनीच दहशतवादी पोसले आणि अण्वस्त्र तयार करण्याचे तंत्र दहशतवाद्यांपर्यंत पोहोचवले. सध्याच्या काळात दहशतवाद हा युद्धाला पर्याय झाला असून यापुढील युद्धे समोरासमोर होण्याऐवजी दहशतवादाच्या माध्यमातून लढली जाणार आहेत. एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निरपराध लोकांना बेसावध गाठून ठार मारण्याची पद्धत रूढ होणे, हे समाजापुढील मोठे संकट आहे. त्यासाठी युवकांनी कायम तत्पर राहून अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सहभाग देण्याची गरज आहे. त्यासाठी सैन्यदलात सामील व्हा.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केला तर आभार व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल कुलकर्णी यांनी मानले. (वार्ताहर)

संध्या रविवार, दि. ५ फेब्रुवारी २०१७ ६

# दहशतवादी जन्माला येत नाही, घडवला जातो –डॉ. शेकटकर

## बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमाला



• राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजीत व्याख्यानमालेत बोलताना निवृत्त लष्करी अधिकारी लेफ्टनंट जनरल डॉ.डी.बी. शेकटकर. (छाया : किरण खुडे)

जिल्हा वृत्त केसरी पुणे, ५ फेब्रुवारी २०१७ ५

# दहशतवादी जन्माला येत नाही, घडवला जातो : डॉ. शेकटकर



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित व्याख्यानमालेत बोलताना निवृत्त लष्करी अधिकारी लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर)

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख